<u>शाहिरी महोत्सव २०१९</u>
आयोजन खर्चास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण ८२१९/प्र. क्र. ५३/सां.का.४
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २२ फेब्रुवारी, २०१९

<u>वाचा</u> :- संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र. सां.का.सं/६०७, दिनांक ६ फेब्रुवारी, २०१९

<u>प्रस्तावना :-</u>

शाहिरी ही लोककला महाराष्ट्राच्या वैभवशाली संस्कृती आणि परंपरेचा अविभाज्य भाग आहे. या लोककलेचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने दिनांक २६ ते २८ फेब्रुवारी, २०१९ या कालावधीत राज्य शासनाच्या वतीने आयोजित करण्यात येणा-या शाहिरी महोत्सवाच्या खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

शाहिरी महोत्सव - २०१९ चे जि. औरंगाबाद येथे आयोजन करण्यासाठी येणा-या रुपये २०,५०,०००/- (रुपये वीस लाख पन्नास हजार फक्त) एवढया अंदाजित खर्चास खालील तपशिलाप्रमाणे मंजूरी देण्यात येत आहे.

अ. क्र.	खर्चाचा तपशिल	रुपये
१	कलापथकातील कलाकारांची निवास व्यवस्था- ५ दिवस, रोज अंदाजे ४० कलाकार, १५ रुम प्रति रुम रु.२५००/- प्रमाणे	१,१२,५००/-
२	महोत्सवात सहभागी होणाऱ्या कलावंताना देण्यासाठी प्रमाणपत्र छपाई, लिहिणावळ (१५० प्रमाणपत्र)	२१,०००/-
३	रोज ३ शाहिरी पथक x ३ दिवस = ९ शाहिरी पथकांना सन्मानचिन्ह	५१,०००/-
४	अंतर्गत वाहन व्यवस्था	४५,०००/-
५	**व्हेन्यु व्यवस्था (३ दिवस)** १. स्टेजच्या पुढे ८ x ४ ची स्टेप २.स्टेजच्या मागे दोन बाजूला ८ x ४ ची स्टेप ३. कॅमेरा प्लॅट फॉर्म ४. प्रवेशव्दार (बॉक्स टाईप) ५. स्टेज २० x ३० कारपेटसह ६. व्हेन्युच्या परिसरात लहान प्लान्टस संख्या २० ते २५	२,२३,७००/-
	उदघाटनासाठी व प्रेक्षकांच्या बसण्याची व्यवस्था (३ दिवस) (१५ आच्छादनासह खुर्च्या, ५ टिपॉय, ४ स्टँड फॅन, १ डायस) प्रेक्षक संख्या अंदाजे २५०० ते ३००० १. व्हीआयपीसाठी ३ सीटर सोफे - १० २. प्लास्टिक खुर्च्या - ३००० ३. बैठक व्यवस्थेची ताडपत्री ४. बांबूचे बॅरीकेडींग	९०,०००/-

६	**ध्वनी व्यवस्था (३ दिवस)** (खुल्या मैदानातील २५०० ते ३००० रसिकांकरिता आणि एकावेळी १५ ते २० कलाकार व वादकांसाठी माईकची स्टेजवर व्यवस्था रोज २.३० तास) **प्रकाश व्यवस्था (३ दिवस)** १. पार - १२ २. एलईडी पार - १० ३. स्पॉट सिटीकलर - १० नग ४. एलईडी वॉशेस - २ नग ५. ऑपरेटिंग बोर्ड ६. जनरल लाईट-हॅलोजन ६० मरक्युरी बल्प १० वर्कींग लाईट, केबलींग	२,१०,०००/-
७	व्हीडीओ शुटींग, छायाचित्रण (३ दिवस) ३ कॅमेरे	१,१५,०००/-
८	**जाहिरात** (३०० चौ.से.मी. आकार जाहिरात) ४ दिवस रोज ४ वृत्तपत्र = १६ वृत्तपत्र (कार्यक्रम १ दिवस अगोदरसह ४ दिवस जाहिरात)	१,५०,०००/-
९	निमंत्रण पत्रिका - लिफाफे छपाई व वितरण व्यवस्था - १५०० पत्रिका	६०,०००/-
१०	**बोर्ड, बॅनर, होर्डींग, गेट** (प्रिंटींग, माउंटींग,कोआर्डीनेशन) २ बोर्ड, १० बॅनर, ४ होर्डींग्ज, २ बॉक्सगेट	९०,०००/-
११	**सुरक्षा व्यवस्था (३ दिवस)** फोटो आयडी कार्ड समन्वयक व कर्मचाऱ्याकरिता क्लॉथ मॉस्कींग ४ बाजूने १० सिक्युरिटी गार्ड (स्त्री, पुरुष मिळून)	३०,०००/-
१२	**जनरेटर व्यवस्था (३ दिवसासाठी)** १२५ केव्हिए जनरेटर सेट २० शिफ्ट रोज किमान ४ तास	१,५०,०००/-
१३	**मैदान भाडे**	४०,०००/-
१४	**स्वागत व्यवस्था- फुलांची सजावट, पुस्तके**	२१,०००/-
१५	**अनुषंगिक सुविधा (३ दिवस)** मोबाईल टॉयलेट - ६ (३ पुरुष, ३ स्त्री) अटेन्डन्ट,साफसफाई केमिकल्ससह	६०,०००/-
१६	**चहा, अल्पोपहार, भोजन व्यवस्था (३ दिवस)** (कलापथकातील कलाकारांचा चहा-अल्पोपहार, भोजन) (कलाकारांना कार्यक्रम स्थळी व मुक्कामाच्या ठिकाणी चहा, पाणी, अल्पोपहार पुरविणे)	१,४०,०००/-
१७	**महोत्सवात सहभागी कलापथकांचा प्रवास खर्च व मानधन** (प्रती कलापथक प्रवासखर्चासह एकत्रित मानधन रुपय ४०,०००/-)	३,६०,०००/-
१८	**आर्टवर्क खर्च :** जाहिरात, बोर्ड, बॅनर, निमंत्रण पत्रिका, लिफाफे, होर्डींग, प्रमाणपत्र	२५,०००/-
१९	**निवेदक मानधन :** (२१०० x १ x ३ दिवस)	६,३००/-
२०	इतर अनुषंगिक खर्च	५०,०००/-
	एकूण रुपये	**२०,५०,०००/-**

२. उपरोक्त आयोजनास येणारा खर्च नियमानुसार करण्याची जबाबदारी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांची राहील.

३. यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना नियंत्रण अधिकारी तसेच लेखाधिकारी, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. सदरचा खर्च हा मागणी क्र. झेडडी-२, २२०५, कला व संस्कृति, (००) १०२, कला व संस्कृती प्रचालन, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना - राज्य योजनांतर्गत योजना, (०२) राज्य नृत्य, नाटय, तमाशा व संगीत महोत्सव, (०२) (०२) राज्य नृत्य, नाटय, तमाशा व संगीत महोत्सव (२२०५ १५०७) ५० इतर खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

५. सदर प्रस्तावास वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ वित्तीय अधिकारी नियम पुस्तिका १९७८, भाग पहिला, उपविभाग ३, अ.क्र.४, परिच्छेद क्र. (२७) (२) (अ) अन्वये प्रशासकीय विभागास प्राप्त अधिकारानुसार, तसेच समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग यांचे शासन निर्णय क्र. सांकासं-१३७६/ ८४५७ XII, मंत्रालय, मुंबई दिनांक ८ मार्च, १९७७ अन्वये मान्यता देण्यात येत आहे.

६. या प्रस्तावास वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र. अर्थसं २०१८/प्र.क्र.६९/ अर्थसं-३, दिनांक २ एप्रिल, २०१८ मधील परिच्छेद क्र. ६ (अ) (ब) (क) व (८) (७) ची पूर्तता होत असून उर्वरित सर्व परिच्छेद व परिशिष्टातील उर्वरित सर्व अटी लागू होत नाहीत.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०२२६१६४९२४३५२३ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by Vilas Ramrao Thorat
Date: 2019.02.26 16:52:30 +05'30'

(विलास रा. थोरात)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई
२. प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. उप सचिव (सांस्कृतिक कार्य), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

४. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) - १/२ मुंबई/नागपूर महाराष्ट्र राज्य
८. महालेखापाल (लेखा परीक्षा) - १/२ मुंबई/नागपूर महाराष्ट्र राज्य
९. अवर सचिव, अर्थसंकल्प शाखा, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
१०. निवड नस्ती, सां.का.४